## MAHARASHTRA ACT No. XXXIII OF 1974.

## THE MAHARASHTRA SPECIAL PROVISION FOR PAYMENT OF STAMP DUTY ACT, 1974.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक २ सप्टेंबर १९७४ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एस्. डब्ल्यू. धुरंदर,
अपर सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXXIII OF 1974.

## AN ACT TO MAKE TEMPORARY PROVISION FOR THE COLLECTION OF THE STAMP DUTY CHARGED OR CHARGEABLE UNDER THE BOMBAY STAMP ACT, 1958 OTHERWISE THAN BY STAMPS.

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर, " महाराष्ट्र शासन राजपत्रात " दिनांक ७ सप्टेंबर १९७४ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

## सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ याअन्वये आकारले जाणारे किंवा आकारण्याजोगे मुद्रांक शुल्क मुद्रांकांखेरीज अन्य रीतीने वसूल करण्यासाठी तात्पुरती तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ अन्वये आकारले जाणारे किंवा आकारण्याजोगे मुद्रांक शुल्क, विवक्षित मुद्रांकांच्या टंचाईमुळे, मुद्रांकांखेरीज, अन्य रीतीने वसूल करण्यासाठी तात्पुरती तरतूद करण्याकरिता तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली होती, म्हणून त्यांनी, महाराष्ट्र मुद्रांक शुल्क प्रदानासंबंधी विशेष तरतूद करणारा अध्यादेश, १९७४ हा, दिनांक २८ जून १९७४ रोजी प्रख्यापित केला;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे, राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र मुद्रांक शुल्क प्रदानासंबंधी विशेष तरतूद करणारा अधिनियम, १९७४ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, प्रारंभ व कालावधी.

(२) तो, २८ जून १९७४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम पाच याच्या कलम २५३-ब ची सुधारणा.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (ज्यात यापुढे ज्याचा "मुख्य अधिनियम" असा निर्देश करण्यात आला आहे) याचे कलम २५३-ब, पोट-कलम (१) मधील परंतुकाच्या खंड (अ) मध्ये, "बारा वर्षांपेक्षा" या मजकुराऐवजी "चौदा वर्षांपेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम पाच याच्या कलम २५३-क ची सुधारणा.

३. (१) मुख्य अधिनियमाचे कलम २५३-क, पोट-कलम (१) मध्ये, "बारा वर्षांपेक्षा" या मजकुराऐवजी "चौदा वर्षांपेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी कोणत्याही वेळी, कलम २५३-क च्या परंतुकाच्या उप-बंधानुसार केलेल्या नियुक्तीवर किंवा परवानगी दिलेल्या सेवानिवृत्तीवर पोट-कलम (१) मधील कोणत्याही मजकुराचा परिणाम होत असल्याचे मानण्यात येणार नाही.

सन १९७४ चा महाराष्ट्र अध्यादेश तीन याचे निरसन व व्यावृत्ति.

४. (१) महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, १९७४ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) (अध्यादेश) अशा रीतीने निरसित करण्यात आला असला तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही, या अधिनियमान्वये सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

वा. म. कुलकर्णी,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.